महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १ हजार ४६८ शाळा यावर्षीही वेतनेत्तर अनुदानापासुन वंचित राहणार असल्याबाबत

(१) २३५४९ (१०-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १ हजार ४६८ शाळा यावर्षीही वेतनेत्तर अनुदानापासून वंचित राहणार असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वेतनेत्तर अनुदान न देण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार सदर अनुदान तात्काळ देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१६-०६-२०१७) :(१) होय.

(२), (३) व (४) शासन परिपत्रक, वित्त विभाग दिनांक १७ एप्रिल, २०१५ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थाना अनुदाने वितरीत करण्यापूर्वी सदर संस्थाकडून राज्य शासनास येणे असणारी रक्कम वसूल करुनच उर्वरीत अनुदान वितरीत करण्यात यावे असे आदेश आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेकडून रुपये ८,१८,६६,६४४/-इतकी अखर्चित वसुलपात्र रक्कम शासनाकडे येणे बाकी आहे. सदर रक्कम शासनाकडे जमा केल्या नंतर सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस वेतनेत्तर अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील मुंबई विद्यापीठाच्या सर्व सिनेट व सदस्यांचा कार्यकाळ तसेच विद्यार्थी तक्रार निवारण समिती संपुष्टात आल्याबाबत

(२) ३८२१० (२०-०१-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई विद्यापीठाच्या सर्व सिनेट व सदस्यांचा कार्यकाळ तसेच विद्यार्थी तक्रार निवारण समितीही संपुष्टात आल्याने विद्यापीठाचा एकूणच कारभार विस्कळीत झाला असून, विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी योग्य ती उपाय योजना करण्याबाबतची मागणी विद्यार्थी संघटना, जागरुक नागरिक, विविध राजकीय पक्षाचे पदाधिकाऱ्यांनी माहे ऑगस्ट, २०१५ वा त्या सुमारास मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण)यांच्याकडे सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) होय, अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही. अशा प्रकारची निवेदने मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) व मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्याकडे प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(३) दिनांक ०१ मार्च, २०१७ पासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६अंमलात आला असून सदर कायद्यातील तरतुदीनुसार सर्व प्राधिकरणे निर्माण करण्याची कार्यवाही विद्यापीठामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आदिवासी विभागातील "कायम" विनाअनुदानित तत्वावर परवानगी दिलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत

(३) ५२६११ (२६-०५-२०१६). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ४३ व्या बैठकीत राज्यातील आदिवासी विभागातील "कायम" विनाअनुदानीत कनिष्ठ महाविद्यालयांना ५ वर्षांनंतर अनुदानावर आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनुषंगाने शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग यांच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या मुल्यांकन अहवालानुसार नागपूर विभागातील ६२ कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदानास पात्र ठरविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर विभागातील अनुदानास पात्र ठरलेल्या ६८ कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत. ?

श्री. विनोद तावडे (१६-०६-२०१७) :(१) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक टिएसपी २००३/प्र.क्र.१०१/का.६, दिनांक २६ जुलै, २००४ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयांचा समावेश नाही.
(२) व (३) नागपूर विभागातील ६१ कनिष्ठ महाविद्यालयांचा मुल्यांकन प्रस्तावात समावेश आहे. त्यावर पुढील कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील शहापूर, तलासरी, मोखाडा इ. आदिवासीबहुल भागातील विना-अनुदानित शाळेतील शिक्षक २००१ पासून विनावेतन तत्वावर काम करीत असल्याबाबत

(४) ६०७१३ (२२-०८-२०१६). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील शहापूर, तलासरी, मोखाडा इ. आदिवासीबहुल भागातील विना-अनुदानित शाळेतील शिक्षक सन २००१ पासून विनावेतन तत्वावर काम करीत असून सन २०१२ मध्ये शाळेची पटसंख्या निश्चिती करुन मान्यता देण्यात आली परंतू अद्यापपर्यंत या भागातील शाळेतील शिक्षकांना पगार निश्चिती मंजूर झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी वाडी वाडयात, गावात पायपीट करुन उपाशीपोटी राहून आदिवासी मुलांना शिक्षणासाठी प्रवृत्त करणाऱ्या व वर्षानुवर्ष ज्ञानदानाचे काम करणाऱ्या गरीब शिक्षकांना पगारासाठी अनुदान लवकर मंजूर करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१६-०६-२०१७) :(१) नाही. शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये दिनांक १४ जून, २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले. तसेच दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये पात्र शाळांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

लघु व मध्यम उद्योजकांना जागा उपलब्ध करून देणेबाबत

(५) ६२७७६ (२२-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण औद्योगिक क्षेत्रात (जि.पुणे) लघु व मध्यम उद्योजकांना जागा उपलब्ध होत नसल्याचे माहे मे,२०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोठे उद्योजक मध्यम व लघु उद्योजकांकडून कच्च्या व इतर मालाची खरेदी करत असल्याने चाकण औद्योगिक क्षेत्रात लघु उद्योजकांना जागा उपलब्ध होणेकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी उद्योग मंत्री यांस माहे जून,२०१६ मध्ये वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लघु व मध्यम उद्योजकांना जागा उपलब्ध करून देणेबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१६-०६-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि. ३०/०७/२०१६ रोजीच्या ३६७ व्या बैठकित ठराव क्रमांक ५५९० नुसार ठराव पारीत केला आहे की, १) नविन औद्योगिक क्षेत्राचा आराखडा तयार करताना सुक्ष्म व लघु उद्योगांसाठी एकूण औद्योगिक भूखंडाखालील क्षेत्राच्या २०% क्षेत्र २००,५००,१०००, व २५०० चौ.मी. पर्यंत क्षेत्राचे भूखंड राखीव ठेवण्यात यावे (२) महामंडळाने यापूर्वीच विकसित केलेल्या परंतू जेथे सरळ पध्दतीने भूखंडाचे वाटप करण्यात येते, त्या औद्योगिक क्षेत्रात जे क्षेत्र वाटपासाठी उपलब्ध होईल त्यामध्ये २०% क्षेत्र सुक्ष्म व लघु उद्योगांसाठी राखीव ठेवण्यात यावे.

तसेच दि.१६.११.२०१६ च्या परिपत्रकान्वये भूसंपादनानंतर ताबा प्राप्त क्षेत्राचा आराखडा तयार करत असताना सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी एकूण औद्योगिक भूखंडांखालील क्षेत्राच्या २०% क्षेत्र राखीव ठेवण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठातील LLM च्या विद्यार्थ्यांवर होत असलेला अन्याय

(६) ६५०२२ (१७-०९-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठात पदव्युतर शिक्षण घेण्यासाठी कायदा विभाग असून येथे विविध ठिकाणाचे विद्यार्थी दोन वर्षाच्या LLM अभ्यासक्रमाच्या शिक्षणासाठी प्रवेश घेतात. या परीक्षेत दोन प्रात्यक्षिके व दोन लेखी परीक्षा असून यापैकी प्रथम वर्षाच्या अथवा दुसऱ्या वर्षाच्या एखाद्या जरी परीक्षेत विदयार्थी नापास झाला तर फेर परीक्षा देण्यासाठी त्याला पुन्हा वर्षभराचा प्रवेश घ्यावा लागतो. म्हणजेच विद्यार्थ्याला दुसऱ्या वर्षासाठी एकाच वर्षात दोनदा प्रवेश घ्यावा लागत असल्याचे दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फेरपरिक्षेसाठी पुन्हा त्याला संपूर्ण ट्युशन फी, जिमखाना फी, लायब्ररी फी इत्यादि सर्व फी भराव्या लागतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यापीठाच्या इतर विभागाच्या परीक्षेत विद्यार्थी नापास झाला तर त्याला फक्त परीक्षा फी भरून परीक्षेस बसता येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विद्यापीठाच्या कायदा विभागातच असा नियम बनविण्याची कारणे काय आहेत तसेच या नियमामुळे विदयार्थ्यांवर होणाऱ्या अन्यायाबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२) एलएलएमच्या दुसऱ्या वर्षासाठी विद्यार्थी प्रात्यक्षिक परीक्षेत नापास झाल्यास (सत्र तिसरे किंवा चौथे) त्या विद्यार्थ्यास फक्त परीक्षेची फी भरावी लागते. सदर विद्यार्थ्यास परीक्षा फी व्यतिरिक्त कोणतीही फी (ट्युशन फी, जिमखाना फी, लायब्ररी फी) भरावी लागत नाही.
(३) व (४) मुंबई विद्यापीठाच्या अध्यादेश क्र. ५२३९ च्या आदेशानुसार नापास झालेल्या विद्यार्थ्यास फक्त परीक्षा फी भरावी लागते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी स्थापन करण्याबाबत

(७) ६५९९५ (१६-१२-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी स्थापन करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साहित्य अकादमीचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्यासाठी ठिकाण निश्चित करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, सदर अकादमीचे प्रत्यक्ष कामकाज कोणत्या कालावधीपासून सुरु करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.
राज्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी स्थापन करण्याबाबत शासनाने अद्याप निर्णय घेतलेला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा विभागातून पदवीधर विद्यार्थ्यांना गुणपत्रीका देण्यास विलंब होत असल्याबाबत

(८) ६७७९५ (२७-०१-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा विभागातून पदवीधर विद्यार्थ्यांना गुणपत्रीका देण्यास विलंब होत असल्याने विद्यार्थ्यांना अनेक अडचणीला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने पदवीधर विद्यार्थ्यांना गुणपत्रीका देण्यास लागणाऱ्या विलंबाबाबत चौकशी केली आहे काय,व त्यानुसार याप्रकरणी दोषी असणाऱ्यांवर तसेच विद्यार्थ्यांना गुणपत्रिका लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) मुंबई विद्यापीठातर्फे प्रथम व व्दितीय सत्रात एकूण ७५० परीक्षा घेतल्या जातात. सदरहू निकाल लागल्यानंतर गुणपत्रिकांची छपाई झाल्यानंतर ७५० पेक्षा अधिक महाविद्यालयात पाठविण्याच्या पध्दतीला ४ ते ५ दिवस लागतात. प्रथम व व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांना एटी-केटी असेल अशा विद्यार्थ्यांचे निकाल राखून ठेवले जातात व तृतीय वर्षांचे उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करण्यासाठी गुण व प्रमाणपत्र विभाग संगणक विभागामार्फत गुणपत्रिका ८ ते १० दिवसांत विद्यार्थ्यांना देण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नसल्याबाबत

(९) ६८२२१ (०५-०१-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सन २०११ मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या सात जिल्हयातील ९४८ विद्यार्थ्यांना ५ वर्षे उलटून गेली असूनही शिक्षण विभागाच्या बेजबाबदारपणामुळे अद्याप शिष्यवृत्ती मिळाली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने आर्थिक दुर्बल घटकातील या विद्यार्थ्यांची प्रंलबित शिष्यवृत्ती मिळावी यासाठी केंद्र शासनाकडे कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) :(१) अंशत: खरे आहे. सन २०११ मध्ये शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या १२२०७ विद्यार्थ्यांपैकी ११४४८ एवढ्या विद्यार्थ्यांचा प्रस्ताव केंद्रशासनास पाठविण्यात आला होता. त्यापैकी १०५५९ विद्यार्थ्यांच्या खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम जमा झाली आहे.

वाशिम जिल्ह्यातील शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या १३४ विद्यार्थ्यांचा प्रस्ताव संबंधित शिक्षणाधिका-यांनी सादरच केला नव्हता. सद्य:स्थितीत १३४ विद्यार्थ्यांपैकी १३२ विद्यार्थ्यांचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.
(२) प्रलंबित प्रस्तावातील १६७ विद्यार्थ्यांच्या बँक खात्याची माहिती केंद्रशासनास पाठविण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला पुरातन वास्तूकलेचा दर्जा देवून विकसित करण्याबाबत

(१०) ६९९९९ (१६-१२-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुख्य इमारतीखाली ४०० फूट लांबीचा भुयारी मार्ग असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला पुरातन वास्तूकलेचा दर्जा देवून विकसित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) :(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात मुख्य इमारत व स्वयंपाक घर (आजचे पोतदार संकुल) यांना जोडणारा ४०० फूट लांबीचा भुयारी मार्ग ब्रिटीश काळापासून अस्तित्वात आहे.
(२) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची मुख्य इमारत पुणे महानगरपालिकेच्या ग्रेड-१ हेरिटेज दर्जाची आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ यांच्या परिक्षा शुल्कांमध्ये तफावत असल्याबाबत

(११) ७०३५० (१६-१२-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ यांच्या पीएचडी पात्रतेसाठी आवश्यक असलेल्या पेट-७ परीक्षेसाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षा शुल्कांमध्ये फार मोठी तफावत आहे, हे खरे काय,

(२) असल्यास, तफावतीचे स्वरुप व कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ही तफावत दूर करण्याची मागणी विद्यार्थ्यांनी मा.उच्च शिक्षण मंत्री, शिक्षण सचिव, संचालक यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर तफावत दूर करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) हे खरे आहे.

(२) मराठवाडा विद्यापीठामार्फत ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येणाऱ्या पेट परिक्षेचे शुल्क मागासवर्गीयांसाठी रु. ४००/- असून खुल्या प्रवर्गासाठी रु. ६००/- तसेच नांदेड विद्यापीठामार्फत ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणाऱ्या पेट परिक्षेचे शुल्क अनुसूचित जाती व जमाती या प्रवर्गासाठी एकत्रित शुल्क रु. ९००/- असून इतर प्रवर्गासाठी रु. १२००/- इतके निश्चित केलेले आहे. सदर शुल्क हे व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने लागू करण्यात आले आहे.

(३) अशा प्रकारचे निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.

(४) दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पेट परिक्षेच्या शुल्कात वाढ केलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील माहिम इंडस्ट्रियल इस्टेट येथील महाराष्ट्र पॅरामेडिकल संस्थेकडून विद्यार्थ्यांच्या झालेल्या फसवणूकीबाबत

(१२) ७०४६२ (१६-१२-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माहिम इंडस्ट्रियल इस्टेट येथील महाराष्ट्र पॅरामेडिकल संस्थेकडून विद्यार्थ्यांच्या झालेल्या फसवणूकीसंदर्भात संस्थेवर कारवाई करण्याचे आदेश मुंबई शहर जिल्हाधिकाऱ्यांनी सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण तसेच सहसंचालक, तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय यांना माहे ऑक्टोबर, २०१६ च्या दुसऱ्या आठवडयात वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त संस्थेकडून विद्यार्थ्यांची कोणत्या प्रकारची फसवणूक केली आहे व त्यासंदर्भात संस्थेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०४-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणाचे अनुषंगाने तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई यांचे मार्फत चौकशी समिती गठीत करण्यात आलेली होती. चौकशी समितीच्या अहवालानुसार संस्थेतील विद्यार्थ्यांची फसवणुक झाल्याचे आढळून येत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्र संत तुकडोजी महाराज विश्व विद्यालय नागपूर यांनी पदवी परीक्षेचा निकाल विहित कालावधी न लावल्याबाबत

(१३) ७१२७० (२७-०१-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्र संत तुकडोजी महाराज विश्व विद्यालय नागपूर यांनी पदवी परीक्षेचा निकाल विहित कालावधीत न लावल्याने कुमार सचिन वाकोडे या विद्यार्थ्याच्या पुढील शिक्षणाकरिता आवश्यक ते गुणांकन न लिहिल्यामुळे त्याचे झालेल्या शैक्षणिक नुकसानीस जबाबदर असलेल्या अधिका-यावर तातडीने कारवाई करून त्याचेसह विदर्भातील सर्व पिडीत विद्यार्थ्यांना चालू वर्षी विधी व कायदा तसेच त्यांच्या मागाणीनुसारच्या अभ्यासक्रमास विशेष बाब म्हणून प्रवेश मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी, अचलपूर यांनी दि. २२ सप्टेंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांना लेखी पत्र देवून मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर पत्राच्या अनुषंगाने संबंधित बी.एससी. ६ वे सत्र परिक्षेचे निकाल दिनांक ०५/०८/२०१६ रोजी घोषित झाले होते. उशिरा निकाल लागल्याने ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी विद्यापीठात अर्ज सादर केले त्यांना विद्यापीठ विभागात व इतर संलग्नित महाविद्यालयात एम.एससी. पाठ्यक्रमात दिनांक २५ ऑगस्ट, २०१६ पर्यंत प्रवेश देण्यात आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले नाही. विधी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची तारीख वाढविण्याच्या अनुषंगाने कुलगुरुंनी संचालक, उच्च शिक्षण यांना दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या पत्राव्दारे विनंती केली होती.

तथापि, श्री.सचिन वाकोडे या विद्यार्थ्याने गणित विषयाच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकनाकरिता अर्ज केला होता. पुनर्मुल्यांकनाअंती त्याच्या निकालात कोणताच फरक झाला नाही. सबब सदर विद्यार्थी विधी व इतर पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्र ठरत नाही. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असे म्हणता येणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठा अंतर्गत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितसंबंधीत तक्रारींचे निवारण करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीबाबत

(१४) ७१४९४ (०५-०१-२०१७). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुंबई विद्यापीठा अंतर्गत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितसंबंधीत तक्रारींचे निवारण करण्यासाठी तक्रार निवारण स्थापनेच्या नंतर सदर समितीने सन १९९८ च्या नियमांना बगल दिल्याने उक्त समितीच कायद्याच्या कचाट्यात सापडली असल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात विद्यापीठ आणि संलग्नीत कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे तक्रार निवारण करण्यासाठी सदर समिती असणे अनिवार्य आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम १४ (७) मधील तरतुदीनुसार कुलगुरुंना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अनुषंगाने दिनांक ४ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या टिप्पणीनुसार तदर्थ विद्यार्थी तक्रार निवारण समिती गठीत केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील गिरगाव चौपाटी स्थित भवन्स महाविद्यालयाच्या अयोग्य कारभाराबाबत

(१५) ७१५१९ (२७-०१-२०१७). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गिरगाव चौपाटी स्थित भवन्स महाविद्यालयाच्या अयोग्य कारभारामुळे बी.एम.सी. भाग ३ च्या ३ विद्यार्थ्यांना तृतीय वर्ष परिक्षेला प्रवेश पत्र उपलब्ध न झाल्याने परिक्षेला बसता आले नसल्यामुळे सदर विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाणार असल्याने विद्यार्थ्यांनी महाविद्यालयावर गुन्हा दाखल केल्याचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात मुंबई विद्यापीठाप्रमाणेच संलग्नित महाविद्यालयामध्ये सुध्दा असे प्रकार वारंवार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) भवन्स महाविद्यालयातील विज्ञान विभागाच्या तृतीय वर्ष ३ च्या एकूण ४ विद्यार्थ्यांचे परिक्षा प्रवेशपत्र दि. १७/१०/२०१६ पर्यंत विद्यापीठाकडून ऑनलाईन जनरेट झाले नव्हते. या ४ विद्यार्थ्यांपैकी एका विद्यार्थ्याने पूर्न-परिक्षार्थी म्हणून पुन्हा त्याच वर्गात प्रवेश घेतला होता. त्या विद्यार्थ्यास मुंबई विद्यापीठाकडून २ पीआरएन नंबर देण्यात आले होते व एका विद्यार्थ्याची गुणपत्रिका साक्षांकित न केल्यामुळे त्याला पीआरएन नंबर देण्यात आला नव्हता. दि. १८/१०/२०१६ रोजी चारही विद्यार्थ्यांचे हॉल तिकीट मुंबई विद्यापीठाकडून भवन्स महाविद्यालयाला ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झाले. या चार विद्यार्थ्यांपैकी दोन विद्यार्थ्यांना दि. १८/१०/२०१६ रोजी होणाऱ्या सत्र ५ च्या परिक्षेला प्रविष्ठ होता आलेले नाही परंतू मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा नियमाप्रमाणे सत्र ५ च्या परिक्षेचा पेपर सत्र -६ च्या परिक्षेच्या वेळी देता येवू शकतो अशी परिक्षा नियमावलीमध्ये तरतूद आहे व दोन विद्यार्थ्यांची परिक्षा ही दि. १६/१०/२०१६ पासून होती. त्यामुळे त्यांना परिक्षेस प्रविष्ठ होण्यास कोणतीही अडचण आलेली नसल्याने त्यांचे वर्ष वाया जाणार नाही.
(२) हे खरे नाही.
(३) विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाशी संपर्क ठेवून पीआरएन नंबर प्राप्त करुन दिले नाहीत म्हणून हे काम पहाणाऱ्या भवन्स महाविद्यालयातील संबंधित मुख्य लिपीक यांना महाविद्यालयाकडून दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ च्या पत्रान्वये यापुढे भविष्यात असे प्रकार होऊ नयेत म्हणून लेखी समज देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील वसतिगृहे समस्यांबाबत

(१६) ७१७३४ (१६-१२-२०१६). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील वसतिगृहे अनेक समस्यांच्या विळख्यात सापडल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रामुख्याने वसतिगृहातील उपहार गृह, निवासी वाचनालय, फर्निचर विद्युत व्यवस्था टी.व्ही. संच या सह जवळपास १२ खोल्यांचे दुरुस्तीची कामे प्रलंबित असल्याचे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकाच रूम मध्ये ८ ते १० विद्यार्थ्यांना राहावे लागत असून या सह वस्तीगृहाच्या आवारात चोऱ्या तसेच अपघातांच्या घटनांमध्ये वारंवार वाढ होत असूनही वसतिगृह व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष करित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :(१) नाही, हे खरे नाही.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) नाही, हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे, शालेय स्तरावरील प्रकल्पापासून ते पीएचडीचे थिसीस सह संशोधन पत्रीकातील संशोधन निबंध पर्यंतच्या शैक्षणिक प्रकल्पाची होत असलेली विक्री

(१७) ७१८२३ (१६-१२-२०१६). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे, शालेय स्तरावरील प्रकल्पापासून ते पीएचडीचे थिसीस सह संशोधन पत्रीकातील संशोधन निबंध पर्यंतच्या आयत्या शैक्षणिक प्रकल्पाची दीडशे रुपयापासून ते हजार रुपयापर्यंत राजरोस होत असलेल्या विक्रीने शिक्षणाच्या गुणवत्तेस धोका निर्माण होत असल्याची बाब नोव्हेंबर,२०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे प्रकल्प नियमानुसार शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी तयार करणे अपेक्षित असताना विद्यार्थ्यांकडून प्रकल्प विकत घेतले जात असल्याचेही खरे आहे काय,
(३) असल्यास, तयार प्रकल्पाची विक्री हा एक प्रकारचा गैरव्यवहार असून असे प्रकल्प विकणाऱ्यांवर छापे टाकून कारवाई करणे आवश्यक असतांना शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे कास आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) अशा प्रकारची कृती विद्यापीठाच्या निदर्शनास आली नाही. सबब, हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुलात विद्यार्थ्यांच्या सोयी-सुविधा करिता स्वतंत्र ग्रंथालय व नवीन वसतीगृहाची इमारत बांधण्याबाबत

(१८) ७४३०० (२०-०४-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुलात विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने स्वतंत्र ग्रंथालय व अपुऱ्या वसतीगृहामुळे नवीन वसतीगृहाची इमारत मुंबई विद्यापीठ प्रशासनातर्फे बांधण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रंथालय व नवीन वसतीगृहाची इमारत पूर्ण होण्यास किती कालावधी आवश्यक आहे,

(३) असल्यास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :(१) हे खरे आहे.

(२) जून, २०१७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ३० टक्के पेक्षा कमी पटसंख्या असलेली अभियांत्रिकी महाविद्यालये बंद करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

(१९) ७४३३१ (२०-०४-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३६७ अभियांत्रिकी आणि ३८८ व्यवस्थापन विषयक अभ्यासक्रम शिकविणा-या विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये ३० टक्के पेक्षा कमी पटसंख्या असलेली महाविद्यालये बंद करण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असून त्यानुसार

उक्त महाविद्यालये बंद करण्याची प्रक्रिया अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने सुरु केली असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील, एकूण किती व कोणत्या महाविद्यालयात, सलग ५ वर्षात, ३० टक्यापेक्षा कमी प्रवेश झाल्याचे आढळून आले, त्यानुसार माहे फेब्रुवारी, २०१७ पर्यंत किती महाविद्यालये बंद करण्यात आली वा बंद करण्यात येणार आहेत,

(३) तसेच, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वैद्यकीय औषध निर्माण व्यवस्थापन शिक्षण शास्त्र इत्यादी शाखांमध्ये विद्यार्थ्यांची टंचाई गेली ५ वर्षे सातत्याने जाणवत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत फेरविचार करुन आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची गैरसोय न करता सदर निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) :(१) व (२) राज्यातील अभियांत्रिकी व व्यवस्थापन विषयक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेमध्ये ज्या अभ्यासक्रमास गत ५ वर्षात ३० टक्क्यापेक्षा कमी प्रवेश झाले आहेत, ते अभ्यासक्रम बंद करण्याची तरतूद अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने माहे जानेवारी,२०१७ मध्ये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी प्रसिध्द केलेल्या ॲप्रुवल प्रोसेस हॅण्डबुक मध्ये करण्यात आली आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

राज्यातील अभियांत्रिकी व तत्सम व्यावसायिक संस्था/अभ्यासक्रम सुरु ठेवणे/ बंद करणे ही बाब अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या कार्यकक्षेतील आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

शालेय शिक्षण विभागाच्या नववी अनुतीर्ण विद्यार्थ्यांसाठी जलदगती शिक्षण पद्धत ही योजना राबवण्याचा निर्णयाबाबत

(२०) ७४५१२ (२०-०४-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१६ या शैक्षणिक वर्षात नववीत अनुतीर्ण झालेल्या विदयार्थ्यांची संख्या दीड लाखांच्या आसपास असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाने नववीत अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी "जलदगतीचे शिक्षण" ही पध्दत राबवण्याचा निर्णय दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदरहू योजना त्वरीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) होय.

(२) व (३) शासन निर्णय दि.३१ डिसेंबर, २०१६ अन्वये राज्यात जलदगतीने शिक्षण पध्दती राबविण्यासंदर्भात कार्यक्रम घोषित केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा वर्ग तुकड्यावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन न मिळाल्याबाबत

(२१) ७४८०८ (२०-०४-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यावरील ८ हजार ९७० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे सन २००६ मध्ये अनुदानास पात्र घोषित केल्यानंतरही त्यांना दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ अखेरपर्यंत वेतन अदा करण्यात आले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत १५ वर्षापासून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विनावेतन काम करीत असून मूल्यांकनाच्या निकषात पात्र होऊन सहा महिन्याच्या कालावधी होऊनही निधी मंजूर होत नसल्याने शिक्षकाच्यावर उपासमारीची तसेच आत्महत्येस प्रवृत्त होण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त अनुदानास पात्र शिक्षकांची आकडेवारी जाहीर होऊनही अद्याप वेतन मंजूर न झालेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर पदांसाठी सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पी

अधिवेशनात निधीची तरतूद करावी अशी मागणी शिक्षक आमदारांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर शिक्षकांना तातडीने वेतन अदा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१), (२), (३) व (४) दिनांक १४ जून, २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आले. तसेच, शासन निर्णय दि.१ फेब्रुवारी, २०१७ अन्वये पात्र शाळाना अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अप्रकाशित साहित्य प्रकाशित करण्याबाबत

(२२) ७४८०९ (२०-०४-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अप्रकाशित साहित्य प्रकाशित करण्यासाठी प्रकाशन समितीचे सदस्य सचिव वसंत मून यांचे निधन झाल्यामुळे सन २००४ सालापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्याचा एकही खंड डिसेंबर, २०१६ अखेर प्रकाशित झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अप्रकाशित साहित्य प्रकाशित न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केलीआहे काय व त्यानुसार सदरचे साहित्य प्रकाशित करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

सन २००४ नंतर पुढीलप्रमाणे खंड प्रकाशित करण्यात आले आहेत. :- १) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारीता (२००५), २) डॉ. बाबासाहेब आंबेडकर करस्पॉन्डन्स (२००६), ३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर फोटोबायोग्राफी (२०१०), ४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चित्रमय चरित्र (२०१०), ५) सोअर्स मटेरियल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक (१९९०, (२००८ दुसरी आवृत्ती)), ६) स्पेशल इश्यू- अनिहिलेशन ऑफ कास्ट (२०१३ (२०१६ दुसरी आवृत्ती)), ७) विशेष आवृत्ती जाती व्यवस्थेचे निर्मूलन (२०१५ (२०१६ दुसरी आवृत्ती)).

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्याबाबत

(२३) ७५३११ (२०-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) :(१) होय.
(२) व (३) राज्यातील अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांच्या जागा प्रवेशाविना मोठया प्रमाणात रिक्त राहत आहेत. मागील ३ वर्षात रिक्त जागांचे प्रमाण ४०टक्क्यांपेक्षा अधिक आहे. तसेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करणे ही बाब खर्चिक आहे. त्यामुळे नाशिक येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याची आवश्यकता नाही.

मुंबई विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांचे निकाल लागण्यास होणाऱ्या विलंबाबात

(२४) ७५५१० (०६-०५-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय पोतनीस (कलिना), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांचे निकाल पुनर्मुल्यांकना नंतर मोठ्याप्रमाणात बदलत आहेत मात्र फाइन आर्टच्या विद्यार्थ्यांना ही सुविधा नसल्याने त्याचा निकालावर परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच विद्यापीठ कायदा, १९९४ नुसार कोणतीही परीक्षा झाल्यानंतर कमीत कमी ३५ आणि जास्तीत जास्त ४५ दिवसांत निकाल जाहीर होणे बंधनकारक असतानाही मुंबई परीक्षा विभागाच्या दिरंगाईमुळे सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या परिक्षांचे निकाल तसेच तृतीय वर्ष, कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या पाचव्या सत्राचा निकाल परीक्षा संपूनही, ४५ दिवस उलटून गेले तरी, अद्याप मुंबई विद्यापीठाने जाहीर केले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तपासणी केंद्राची संख्या ६० वरुन ९० करण्यात येवूनही निकाल वेळेत घोषित झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्नोक्त भाग (१) बाबत विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीने आश्वासन दिले असतानाही पुनर्मूल्यांकन होत नसल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय त्यानुषंगाने शासनाने विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांचे निकाल विहित वेळेत जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :(१) हे अंशत: खरे आहे. कारण मुंबई विद्यापीठामध्ये कुलगुरुंच्या निर्देशानुसार तसेच स्थापत्यशास्त्राचे समन्वयक यांच्या अभिप्रायानुसार स्थापत्यशास्त्र तसेच ललित कला शाखेचे पुर्नमुल्यांकन करता येत नाही.

(२) व (३) सन २०१५-१६ चे सर्व निकाल जाहिर करण्यात आलेले आहेत. निकाल लवकर लावण्यासाठी संबंधित शाखेचे समन्वयक यांच्या निर्देशानुसार तपासणी केंद्रांची संख्या वाढविण्यात आली आहे.

(४) मुंबई विद्यापीठामध्ये कुलगुरुंच्या निर्देशानुसार तसेच स्थापत्यशास्त्राचे समन्वयक यांच्या अभिप्रायानुसार स्थापत्यशास्त्र तसेच ललित कला शाखेचे पुर्नमुल्यांकन करता येत नाही.

(५) सत्र २०१७ पासून सर्व परिक्षांच्या उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन On Screen Marking पध्दतीने करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१२-१३, ते २०१४-१५ मध्ये अर्थसंकल्पाच्या अनुक्रमे ०.०८, ०.१०, ०.१० टक्के निधी महिलांच्या कल्याणकारी योजनेसाठी वापरल्याबाबत.

(२५) ७५८२३ (२०-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५ मध्ये अर्थसंकल्पाच्या अनुक्रमे ०.०८, ०.१०, ०.१० टक्के निधी महिलांच्या कल्याणकारी योजनेसाठी वापरल्याची बाब महिलांचे हक्क व कल्याण समितीने केलेल्या पहाणीत माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने उक्त निधीची तरतुद वाढवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :(१) हे खरे आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) मुंबई विद्यापीठाच्या विद्यापीठ निधीतून अर्थसंकल्पामध्ये महिलांच्या कल्याणकारी योजनेसाठी निधीची तरतूद करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील उच्च प्राथमिक शिक्षणाचा दर्जा मागील दोन वर्षाच्या तुलनेत अपरिपक्व असल्याबाबत

(२६) ७५८३५ (२०-०४-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील उच्च प्राथमिक शिक्षणाचा दर्जा मागील दोन वर्षाच्या तुलनेत अपरिपक्व असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महाराष्ट्रातील एका सामाजिक सेवाभावी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातून सदरचे वास्तव निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने राज्यातील उच्च प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) दि.२२ जून, २०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम राबविण्यात येत असून, त्यानुसार प्रथम भाषा व गणित या विषयाच्या चाचण्या राज्यस्तरावरुन घेण्यात येतात. ज्या क्षमतामध्ये विद्यार्थ्यांना अडचणी असतील त्यासाठी कृती कार्यक्रम आखुन प्रत्येक विद्यार्थी प्रभुत्व पातळीकडे वाटचाल करु शकेल हा या कार्यक्रमाचा हेतु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने सर्व शिक्षा अभियानातून वस्तीशाळा सुरु करण्यास मंजूरी देण्याबाबत

(२७) ७६०११ (२०-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने सन २००२ मध्ये सर्व शिक्षा अभियानातून वस्तीशाळा सुरु करण्यास मान्यता दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३ मध्ये बृहत आराखडयातून बीड जिल्हयात २२१ तर केज तालुक्यात २८ वस्तीशाळा सुरु करण्यास मंजुरी दिली असून गत ३ वर्षे या शाळा इमारतीविना भरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त वस्ती शाळाच्या इमारतीबाबत व प्राथमिक सुविधा पुरविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१७) :(१) होय.

(२) व (३) बृहत आराखडयानुसार बीड जिल्हयातील २४९ नवीन प्राथमिक शाळांना मंजूरी दिली आहे. त्यापैकी २२१ शाळा सुरु करण्यात आल्या आहेत. यामध्ये केज तालुक्यातील २८ शाळांचा समावेश आहे. सदर शाळांच्या इमारती वार्षिक कृती आराखडयात प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ४३ खाजगी प्राथमिक शाळांना अनुदान मिळण्याबाबत

(२८) ७६७७६ (२०-०४-२०१७). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ४३ खाजगी प्राथमिक शाळांना अनुदान मिळण्याबाबत दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना स्थानिक लोकप्रतिनिधीनी लेखी निवेदन देऊनही कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) व (२) निवेदन दिले आहे हे खरे आहे. सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या क्षेत्रात कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या नवीन खाजगी प्राथमिक शाळांना शालेय शिक्षण विभागाकडून अनुदान उपलब्ध करून देण्याची तरतूद नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आठवी इयत्तेतील २५% मुलांना दुसरीच्या क्षमतेचे वाचन करता येत नसल्याबाबत

(२९) ७७०९४ (२०-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इयत्ता आठवीतील २५%, तिसरीतील ४१% आणि पाचवीतील ३८% मुलांना दुसरीच्या क्षमतेचे वाचन करता येत नसून याच वर्गातील २०% मुलांना कोणतेच गणित येत नसल्याचे तसेच ३% मुलांना संस्थेचे ज्ञान नसल्याचे वास्तव असरच्या अहवालातून दिनांक १९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, आठवीच्या वयोगटातील सुमारे एक चतुर्थांश मुले पुढील शिक्षणासाठी तयार नसल्याचे या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू असरच्या अहवालात कोण कोणत्या बाबींचा समावेश केलेला आहे,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चोकशी केली आहे काय, व त्यानुषंगाने विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) हे अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सदर अहवालामध्ये विद्यार्थ्यांची इंग्रजी अक्षराची ओळख, इंग्रजी शब्द, वाक्यप्रचार या संदर्भातील क्षमता तसेच शाळेतील राबविण्यात येणा-या मध्यान्ह भोजन योजना, पिण्याचे पाणी, प्रसाधन गृह, गंथालय, विजेची उपलब्धता, संगणक या संदर्भात उहापोह केलेला आहे.

(४) जलद प्रगत शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एसडी-६, दि.९ जानेवारी, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्हयातील अलिबाग पंचायत समितीचे माजी उपसभापती, रेवस ग्राम पंचायतीचे माजी सरपंच यांनी विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याबाबत

(३०) ७७६४७ (२०-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील अलिबाग पंचायत समितीचे माजी उपसभापती, रेवस ग्राम पंचायतीचे माजी सरपंच श्री. अनिल पाटील हे चौल भोवाळे येथील ज्युनिअर कॉलेज मध्ये निरीक्षक म्हणून कार्यरत असतांना दिनांक १७ जानेवारी,२०१७ रोजी वा त्या सुमारास अकरावीच्या

परिक्षा सुरु असतांना एका विद्यार्थिनीशी अश्लील चाळे करुन तिचा विनयभंग केल्याने भयभीत झालेल्या विद्यार्थिनीने याबाबत दुसऱ्या शिक्षकाकडे तक्रार केल्यानंतर दिनांक १९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली असल्याचे, दिनांक २१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत दोषी विरुध्द स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) होय.

(२) होय.

(३) संबंधितावर रेवदंडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शाळांचे डिजिटलयझेशन करण्याबाबत

(३१) ७७७९९ (२०-०४-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अभियाना अंतर्गत सर्व शाळांमधील सर्व वर्ग मार्च पर्यंत डिजिटल करण्यात येणार असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१७ रोजी वा दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त अभियान प्रभावी पणे राबिविण्यासाठी तसेच सदर अभियानाबरोबरच शालबाहय मुलांना शैक्षणिक मुख्य प्रवाहात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) होय.

(२) १. राज्यातील सुमारे ४७,६०१ शाळा डिजिटल झालेल्या आहेत. तसेच शाळा डिजिटल करण्यासाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत सन २०१६-१७ मध्ये १,९८९ उच्च प्राथमिक शाळेस प्रत्येकी रु. ८५,८८२ इतकी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

२. जिल्हा स्तरावरुन जिल्हा नियोजन विकास समितीकडे नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी मंजूर असलेल्या निधीचाही उपयोग शाळा डिजिटल करण्यासाठी करण्यात येत आहे.

३. ग्रामपंचायत स्तरावर १४वा वित्त आयोग, आदिवासी क्षेत्रासाठी पेसा अंतर्गत मंजूर निधी, CSR, स्वयंसेवी संस्था, समाज सहभाग इत्यादी च्या माध्यमातून १००% वर्ग डिजिटल करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

४. कमीत कमी खर्चामध्ये ३२ इंची किंवा त्यापेक्षा मोठा Android TV तसेच मिराकास्ट सारखे उपक्रम, मोबाईल, टॅबलेट, Interactive Board, Projector इत्यादीच्या माध्यमातून प्रत्येक वर्ग डिजिटल करणे सुरु आहे.

५. तंत्रस्नेही शिक्षकांमार्फत प्रशिक्षण देऊन शाळा डिजिटल करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र सरकारच्या सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत आधार कार्ड क्रमांक आवश्यक असण्याबाबत

(३२) ७८०७३ (२०-०४-२०१७). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या बारावीच्या परिक्षेत कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील उच्च गुणवत्ता विद्यार्थ्यांना पदवीव्युत्तर शिक्षणासाठी केंद्र सरकारच्या सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज अपग्रेडेशनसाठी महाविद्यालयाकडून ऑफलाईन अर्जाबरोबर प्रत्येक विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्रमांक आवश्यक असून, 'आधार'शी त्याचे लिंक असणे आवश्यक आहे असे पुणे विभागीय सहसंचालक यांनी पत्र काढले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आधार कार्डची सक्ती करता येणार नाही असे न्यायालयाचे आदेश असूनही पुणे विभागीय सहसंचालक यांनी आधार कार्डच्या सक्ती चे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशीअंती पुणे विभागीय सहसंचालकांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :१) होय. हे खरे आहे.

केंद्र शासनाने केंद्र पुरस्कृत शिष्यवृत्तीसाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात आधार कार्ड बँक खात्याशी लिंक असणे आवश्यक असलेबाबत कळविल्याने, उच्च शिक्षण संचालनालयाकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीद्वारे केंद्र पुरस्कृत शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत आधारकार्ड असणे आवश्यक आहे व त्याचा आधार क्रमांक हा त्याच्या बँक खात्याशी संलग्न असणे आवश्यक आहे असे कळविण्यात आले होते. तसेच उच्च शिक्षण संचालनालयाने प्राचार्य/संस्थाप्रमुख यांनी केंद्र पुरस्कृत शिष्यवृत्तीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी तसेच बँक खाते आधार संलग्न करण्यासाठी प्रोत्साहन देण्याबाबत सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत कळविण्यात आले होते.

तथापि, केंद्र शासनाने दि.३०.९.२०१६ रोजी निर्गमित केलेल्या शुध्दीपत्रामध्ये, केवळ आधार कार्ड क्रमांक नसल्यामुळे विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती नामंजूर करण्यात येऊ नये असे स्पष्टपणे नमूद केले आहे. केंद्र शासनाचे सदरचे शुध्दीपत्र उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहितीसाठी प्रसिध्द करण्यात आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पाथरी (जि.परभणी) येथे सर्व शिक्षा अभियानच्या माध्यमातून गावागावात सुरु करण्यात येणाऱ्या जिल्हयातील वसतीगृहाच्या तपासणीबाबत

(३३) ७९२८३ (२०-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथे सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून गावागावात सुरु करण्यात येणा-या जिल्हयातील वसतीगृहाची शिक्षण विभागाकडून तपासणी वेळेत न झाल्याने वसतिगृहाचे चालू वर्षाचे अग्रीम देयके प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतीगृहाची तपासणी न झाल्याने विद्यार्थी संख्या निश्चित झाली नसल्याने अग्रीम देयके प्रलंबित असून वसतिगृहाचा खर्च चालविण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व तदनुसार उक्त चालू वर्षाचे अग्रीम देयके तात्काळ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसलयास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१७) :(१) हे खरे नाही

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

सरस्वती (ता.लोणार, जि.बुलढाणा) येथील जि.प. मराठी प्राथमिक शाळेत शालेय पोषण आहार योजनेतून आलेल्या धान्याच्या पोत्यावर "महाराष्ट्र शासन शालेय पोषण आहार योजना" असा उल्लेख नसल्याबाबत

(३४) ८०२८७ (२०-०४-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरस्वती (ता.लोणार, जि.बुलढाणा) गावातील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेत माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शालेय पोषण आहार योजनेतून आलेल्या धान्याच्या पोत्यावर "महाराष्ट्र शासन शालेय पोषण आहार योजना" असे लिहिलेले आढळून आले नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदरचे धान्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासण्याकरिता पाठविण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) हे खरे आहे.
(२) नाही, तथापि, त्याच पुरवठयाच्या फेऱ्यापैकी तालुक्यातील अन्य शाळेतील धान्याचे नमुने तपासले आहेत. सदर नमुने नियमानुसार अन्न सुरक्षा प्रमाणकाच्या मानकानुसार असल्याचे शासकीय प्रयोगशाळेने प्रमाणित केले आहे.
(३) संबंधित पुरवठेदारास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या मान्यतेसाठी भोगवाट प्रमाणपत्राची (ओसी) अट बंधनकारक असल्याबाबत

(३५) ८०४५१ (२०-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या मान्यतेसाठी भोगवटा प्रमाणपत्राची (ओसी) अट बंधनकारक केल्यामुळे राज्यातील ओसी नसलेली अनेक महाविद्यालय बंद झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने अशा महाविद्यालयांत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.

थडोमल शहानी इंजिनिअरींग कॉलेज, वांद्रे, मुंबई या संस्थेकडे भोगवटा प्रमाणपत्र नसल्यामुळे दिनांक २४/१/२०१७ रोजी सदर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने स्थलांतरीत करण्याचे आदेश दिले होते.

तथापि, सदर आदेशाविरोधात संस्थेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिकेवर निर्णय देताना मा.उच्च न्यायालयाने संस्थेस दिनांक ३०/३/२०१७ पर्यंत भोगवटा प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत दिली व सदर विहीत मुदतीत भोगवटा प्रमाणपत्र सादर न

केल्यास संस्थेतील विद्यार्थ्यांच्या स्थलांतराची कार्यवाही करण्यात यावी, असे आदेश दिले. त्यानुसार संस्थेने विहीत मुदतीत दिनांक २७/३/२०१७ रोजी भोगवटा प्रमाणपत्र सादर केले असल्याने सदर संस्थेस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता मुदतवाढ दिली आहे. सबब, विद्यार्थ्यांचे स्थलांतर करण्याचा व पर्यायाने त्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही

मुंबई, ठाण्यातील १८ महाविद्यालयांच्या प्राचार्यपदी नियुक्तीबाबत

(३६) ८०४६३ (२०-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाविद्यालयातील प्राचार्यांच्या नियुक्तीसाठी असलेल्या युजीसीचे नियम व निकष डावलून मुंबई व ठाणे जिल्हयातील १८ महाविद्यालयांच्या प्राचार्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची चौकशी करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच मुंबई विद्यापीठाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :(१) व (२) हे खरे नाही. तथापि, महाविद्यालयातील प्राचार्यांच्या अनियमित नियुक्त्यांसदर्भात महाराष्ट्र अंडर प्रिव्हीलेज टिचर्स असोसिएशन (मुप्टा) संघटनेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.८०/२०१५ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०५.०१.२०१७ रोजी संघटनेने निवेदन सादर केल्यानंतर त्याअनुषंगाने निर्णय घेण्याबाबतचे आदेश विभागास तसेच मुंबई विद्यापीठास दिले आहेत.

(३) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार संघटनेने निवेदनामध्ये नमूद केलेल्या प्राचार्यांच्या प्रकरणांची प्रकरणनिहाय तपासणी करुन संघटना व संघटनेने नियुक्तीसंदर्भात आक्षेप घेतलेल्या प्राचार्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर संघटनेने केलेल्या तक्रारीमध्ये काहीही तथ्य नसल्याचे आढळून आले आहे. त्याबाबतचे आदेश दिनांक २९.०४.२०१७ च्या ज्ञापन आदेशान्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही

राज्यातील ६ तंत्रनिकेतन बंद करण्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतलेल्या निर्णयाबाबत

(३७) ८०५५९ (२०-०४-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ६ तंत्रनिकेतन बंद करण्याचा निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतला असून त्यातील ५ तंत्र निकेतनांमध्ये अल्पसंख्यांकासाठी दुसरी पाळी सुरु असल्याने ती बंद करण्यात येऊ नये यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.अल्पसंख्यांक विकास मंत्री यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उपरोक्त ५ तंत्रनिकेतनांमधील अल्पसंख्यांकांसाठीची दुसरी पाळी बंद होऊ नये याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) :(१) होय.

(२) सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरीता राज्यातील शासकीय व शासन अनुदानित अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयातील पदविका अभ्यासक्रमाची एकूण २२८१० इतकी प्रवेश क्षमता आहे. त्यापैकी १९९७० इतक्या जागा भरलेल्या असून २८४० इतक्या जागा रिक्त आहेत. विविध पदविका अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ९०% पेक्षा जास्त विद्यार्थी अभियांत्रिकी महाविद्यालयातील अभ्यासक्रमांना थेट द्वितीय वर्षासाठी प्रवेश घेण्यास इच्छुक असतात. राज्यातील प्रत्येक विद्यापीठ क्षेत्रात एक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय असावे असे शासनाचे धोरण आहे. नवीन स्वतंत्र शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची निर्मिती करावयाची झाली तर त्यास प्रथम चार वर्षाकरीता सुमारे रु.७२ कोटी इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन शासनाच्या उपलब्ध साधन संपत्तीचा व मनुष्यबळाचा जास्तीतजास्त वापर करुन अल्प खर्चात शासकीय तंत्रनिकेतनातील पदविका अभ्यासक्रम टप्प्या टप्प्याने बंद करुन श्रेणीवर्धनाने अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

तसेच सदर ठिकाणी पदविका महाविद्यालयाबरोबरच पदवी महाविद्यालयही चालू करण्याबाबत शासन प्रयत्नशिलआहे.जेणेकरून या तंत्रनिकेतनांमध्ये अल्पसंख्यांकासाठी दुसरी पाळी चालू ठेवता येऊ शकेल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील सांताक्रुझ येथील कालिना विदयापीठाच्या कॅम्पसमध्ये डॉ.राममनोहर त्रिपाठी हिंदी भाषा भवन व डॉ.झाकीर हुसेन ऊर्दू भवनाच्या अपूर्णावस्थेतील कामांबाबत

(३८) ८०६५१ (०६-०५-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सांताक्रुझ येथील कालिना विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये डॉ.राममनोहर त्रिपाठी हिंदी भाषा भवन व डॉ. झाकीर हुसेन ऊर्दू भवन हया दोन्ही कामांचे भूमिपुजन माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान झाले असून त्याकरिता निधी वितरीत करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कामांना अद्यापपर्यंत सुरुवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त काम त्वरीत सुरुवात करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :(१) हे अंशतः खरे आहे. दि.८ सप्टेंबर, २०१४ रोजी डॉ.राममनोहर त्रिपाठी हिंदी भाषा भवन व डॉ.झाकीर हुसेन ऊर्दू भवनाचे भूमीपूजन तत्कालीन मंत्री, उद्योग यांच्या हस्ते करण्यात आले आहे. डॉ.राममनोहर त्रिपाठी हिंदी भाषा भवन बांधण्यासाठी शासनाकडून २ कोटी रुपये रक्कमेचा धनादेश दि.२० जानेवारी, २०१५ रोजी मुंबई विद्यापीठास देण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे. हिंदी भाषा भवन तळमजला व एक मजला अशी प्रस्तावित करण्यात आली होती. तथापि, विद्यानगरी परिसरातील अपूर्ण जागा पाहता, व्यवस्थापन परिषदेने प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र छोट्या इमारती बांधण्याऐवजी विद्यानगरी परिसरात बहुमजली असे भाषा भवन बांधकाम करणे योग्य राहिल, असा ठराव संमत केल्यामुळे हिंदी भाषा भवन तळ मजला व एक मजला इमारत बांधण्यास परवानगी देण्यात आली नाही. तसेच, ऊर्दू भवन बांधण्यासाठी शासनाने घातलेल्या अटी व्यवस्थापन परिषदेला मान्य नसल्यामुळे ऊर्दू भाषा भवन बांधण्यास परवानगी देण्यात आली नाही.

(३) मुंबई विद्यापीठाने ४ ते ६ महिन्यात मास्टर प्लॅन सादर करणेबाबत शासनाने निर्देश दिले आहेत. तसेच, सदरहू कामासाठी विद्यापीठाने विद्यापीठ निधीतून तसेच ऊर्दू भाषा भवनसाठी अल्पसंख्यांक विभाग व हिंदी भाषा भवनसाठी डीपीडीसीमधून जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून निधी उपलब्ध करुन घेणेबाबतही सूचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विद्यापीठ समन्वयकांकडून नियमांचे उल्लंघन झाले असल्याबाबत

(३९) ८०९४२ (२०-०४-२०१७). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण व्यवस्थेचे नियमन करणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, शासनाचे विभाग, स्वायत्त मंडळे यांच्यात समन्वय नसल्यामुळे एकाचवेळी दोन महाविद्यालयांचे प्राचार्यपद व दोन ठिकाणी पूर्णवेळ शिक्षक कार्यरत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे विद्यापीठाच्या समन्वयकांकडून नियमांचे उल्लंघन केले जात असून एकाचवेळी दोन महाविद्यालयांचे प्राचार्य पदाचे लाभ घेतल्याचे तसेच विद्यापीठाच्या स्थानिक पाहणी समितीकडूनही या प्रकरणामध्ये दुर्लक्ष करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात उच्च शिक्षण विभागातील शासकीय व खाजगी अनुदानित महाविद्यालय व शाळांमध्ये असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर देयके अदा करण्याबाबत

(४०) ८१९१३ (२०-०४-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उच्च शिक्षण विभागातील शासकीय व खाजगी अनुदानित महाविद्यालय व शाळामध्ये असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतन व इतर देयके अदा करण्यासाठी संगणकावर नोंदी घेत असताना काही कर्मचाऱ्यांचे वयोधिक्य असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वयोधिक्य असलेली काही कर्मचाऱ्यांचे वयोधिक्य क्षमापित करुन वेतन अदा करण्यात आले असून उर्वरित कर्मचाऱ्यांचे वयोधिक्य क्षमापित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, श्री.यु.एम.शेटे, शिपाई, वारणा महाविद्यालय ऐतवडे (ता.वाळवा, जि.सांगली) यांचे विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) कोल्हापूर यांच्या पत्रान्वये वेतन अनुदान निर्धारणामध्ये यापूर्वीच अमान्य करण्यात आल्याने त्यांच्या कुटुंबियांवर उपाससमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, वयोधिक्य क्षमापित करण्याबाबत शासनस्तरावर प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर कोणता निर्णय घेण्यात आला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, तसेच निर्णय केव्हापर्यंत घेणे अपेक्षित आहे ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) वयोधिक्य असलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्याचे वयोधिक्य क्षमापित करुन वेतन अदा करण्यात आलेले नाही. संबंधित कर्मचाऱ्यांना ऑफलाईन पध्दतीने वेतन अदा करण्यात येत आहे.

विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी माहे मे, २०१३ मध्ये केलेल्या अनुदान निर्धारणाच्यावेळी, श्री.यु.एम.शेटे, शिपाई, वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द यांचे नियुक्तीच्या वेळी वयोधिक्य असल्याचे निदर्शनास आल्यानुसार, त्यांचे वेतन अनुदान अमान्य करण्यात आले आहे. अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नियुक्ती प्राधिकारी हे संबंधित महाविद्यालयाचे व्यवस्थापन असल्यामूळे शासनाच्या प्रचलित नियमानुसार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाच्या व्यवस्थापनेची आहे.

तथापि, वयोधिक्याच्या प्रकरणावर निर्णय घेण्याचा एकत्रित प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून, यामध्ये श्री.उत्तम मल्हारी शेटे, शिपाई, वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द, यांचे नांव अंतर्भूत आहे.

(५) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद पुणे यांनी घेतलेल्या शिक्षक पात्रता चाचणी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत चुकीचे प्रश्न आढळून आल्याबाबत

(४१) ८२०८२ (२०-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद पुणे यांनी दिनांक १६ जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास घेतलेल्या शिक्षक पात्रता चाचणी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेमध्ये प्र.क्र. २४, ३६, ३८ व ४१ हे प्रश्न चुकीचे नमुद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्र.क्र. २४, ४१, ३६ व ३८ यामध्ये प्रिटींग मिस्टेक आढळून आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या चार प्रश्नांमध्ये चुका असतांनाही यातील दोन प्रश्न रद्द केले तर दोन प्रश्न ग्राहय धरण्यात आले असल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले असून त्याबाबतची तक्रार परीषदेकडे करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त विदयार्थ्यांचे नुकसान भरपाई करण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१७) :(१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) प्रश्न क्र.२४ व ३६ मुद्रणदोषामुळे रद्द करण्यात आले. त्याचे गुण कोणत्याही उमेदवारास देण्यात आलेले नाहीत. तसेच प्रश्न क्र.३८ व ४१ या मुद्रणदोषामुळे सदर प्रश्नांच्या योग्य उत्तरासाठी दोन पर्याय येतात. या दोन पर्यायांपैकी कोणताही एक पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांचे उत्तर ग्राहय धरण्यात आलेले आहे. त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

बालभारतीतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत गैरप्रकार होत असल्याबाबत

(४२) ८२१८२ (२०-०४-२०१७). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) मध्ये दिनांक १ डिसेंबरपासून बायोमेट्रिक हजेरी सुरु करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही अधिकारी रजिस्टर आणि बायोमेट्रिक या दोन्ही ठिकाणी स्वाक्षऱ्या न करता दोन वर्षापासून वेतन घेत असून तर काही अधिकारी कामावर हजर नसतानाही दुसऱ्या दिवशी येऊन रजिस्टरवर सह्या करत असल्याचे निदर्शनास आले, हेही खरे आहे काय,

(३) तसेच, बालभारतीतील अधिकारी व कर्मचारी सर्व नियमाचे उल्लंघन करुन मनमानी करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) :(१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही..

शिक्षण हक्क कायदानुसार २५ टक्के आरक्षित प्रवेशासाठी शाळांनी ऑनलाईन नोंदणी करणे बंधनकारक असल्याबाबत

(४३) ८२२१८ (२०-०४-२०१७). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायदानुसार २५ टक्के आरक्षित जागांवर प्रवेशासाठी माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये संबधित शाळांनी ऑनलाईन नोंदणी करणे बंधनकारक असतानाही पुणे व पिंपरी चिंचवड शहर तसेच जिल्ह्यातील ९९ शाळांनी अद्यापही नोंदणी केली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळांची नोंदणी करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे, त्यामुळे आरटीईअंतर्गत राखीव प्रवेशप्रकियेस उशीर होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने ऑनलाईन नोंदणी करण्यास दिरंगाई करणाऱ्या शाळांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे कोणती ?

श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१७) :(१) व (२) अंशत: खरे आहे
शाळांनी वाढवून दिलेल्या मुदतीत ऑनलाईन नोंदणी केली आहे.
(३) ऑनलाईन नोंदणी करण्यास दिरंगाई करणा-या शाळांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सर्वशिक्षा अभियानांअंतर्गत पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके वाटण्याचा निर्णय

(४४) ८२३४२ (२०-०४-२०१७). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्वशिक्षा अभियानांअंतर्गत पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके वाटण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार विद्यार्थ्यांना विनाविलंब मोफत पुस्तके तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) :(१) व (२) सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठयपुस्तक योजना राज्यातील इ.१ ली ते ८ वी मधील शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि खाजगी अनुदानित शाळांतील सर्व विद्यार्थ्यांना लागू आहे. शैक्षणिक सत्राच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना सदर पाठयपुस्तके मिळण्याच्या दृष्टीने पाठयपुस्तकांची छपाई व वाहतुकीचे नियोजन करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थ्यांसाठी खाजगी शाळांत २५ टक्के राखीव कोटा प्रवेश देणे बंधनकारक असतानाही रत्नागिरीमधील शाळांनी प्रवेश प्रक्रिया राबविली नसल्याबाबत

(४५) ८२६६२ (२०-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमांतर्गत वंचित, आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षण विभागाकडून नेमून देण्यात आलेल्या रत्नागिरीमधील ८४ खाजगी शाळांना २५ टक्के राखीव कोटा प्रवेश देणे बंधनकारक असतानाही शाळांनी ही प्रवेश प्रक्रिया प्रभावीपणे राबविली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुसार संबंधीत शाळांवर काय कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१७) :(१) अंशत: खरे आहे

(२) व (३) जिल्हयातील १४ शाळांनी प्रवेश प्रक्रियेसाठी विहित मुदतीत नोंदणी केली नव्हती. परंतु या शाळांना नोटीसा बजाविल्यानंतर शाळांनी नोंदणी केली आहे.

राज्यातील १०९ महाविद्यालयाने आखील भारतीय तंत्रशिक्षण परिषदेला बनावट माहितीपत्र सादर करुन मुदतवाढ घेतली असल्याबाबत

(४६) ८२८२४ (२०-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाच्या अहवालानुसार राज्यातील १०९ महाविद्यालयाने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेला जमिन बांधकाम आणि मनुष्यबळ अशी तीन प्रकारची बनावट माहितीपत्र सादर करुन मुदतवाढ घेतली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी महाविद्यालयांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.

सन २०१५ मध्ये केलेल्या तपासणीनुसार राज्यातील ३३ संस्थांमध्ये जमीन व बांधकाम विषयक मानकामध्ये तर ९९ संस्थांमध्ये अध्यापक, वेतन व इतर मानकांच्या बाबीमध्ये तफावत दिसून आली आहे.

(२) दोषी महाविद्यालयांवर कारवाई करणे, ही बाब अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारित येते. यास्तव संचालक, तंत्र शिक्षण यांचे स्तरावरुन दोषी संस्थांची यादी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे पाठविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ उपकेंद्रा बाबत

(४७) ८३२०८ (२०-०४-२०१७). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ उपकेंद्राचे काम अनेक दिवसापासून बंद आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विद्यापीठ बंद असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :(१), (२) व (३) हे खरे नाही. अहमदनगर येथे विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे सुविधा केंद्र १९८५-८६ पासून चालविले जात असून सदर केंद्रामार्फत डुप्लीकेट गुणपत्रके, टी.सी., मायग्रेशन, पदवी प्रमाणपत्रे, रँक प्रमाणपत्रे, डुप्लीकेट पासिंग सर्टिफिकेट, ट्रान्सक्रिप्ट, इ. साठीचे ऑनलाईन अर्ज स्वीकारले जातात व संबंधित कागदपत्रे विद्यार्थ्यांना वेळेत मिळावीत यासाठी पाठपुरावा केला जातो. तसेच महाविद्यालयांना लागणारी स्टेशनरी पुरविणे, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी ई-लायब्ररी सुविधादेखील सुरु करण्यात आली आहे. विद्यापीठामार्फत अहमदनगर येथे उपकेंद्र सुरु करण्याच्या प्रस्तावास शासनाने तत्वतः मान्यता दिली असून अद्याप अंतिम मान्यता देण्यात आलेली नाही. तथापि, शासनाने अहमदनगर येथे उपकेंद्रासाठी ८५ एकर जागा उपलब्ध करुन दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील प्राथमिक शिक्षकांची इतर अशैक्षणिक कामे कमी करणेबाबत

(४८) ८३४७९ (२०-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक शिक्षकांना विद्यार्थ्यांना शिकवण्या व्यतिरिक्त अनेक अशैक्षणिक कामे करावी लागतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवडणूक, जनगणना, शालेय पोषण आहार हिशोब, सरळ प्रणाली तर अनेक प्रकारच्या प्रशिक्षण शिबिरे या कामांचा यामध्ये समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक शिक्षकांना मदतनीस म्हणून व्यक्तीची नेमणूक करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, पुणे जिल्ह्यातील शिक्षकांनी याबाबत वेळोवेळी निवेदने दिली असून मोर्चे काढले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने शिक्षकांची अशैक्षणिक कामे कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.
(२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम २७ नुसार अशैक्षणिक कामकाजात जनगणना, नैसर्गिक आपत्ती निवारण किंवा स्थानिक प्राधिकरण, राज्य विधानसभा / लोकसभा सार्वत्रिक निवडणूक यासाठीच्या कामकाजाचा अंतर्भाव होतो, हे खरे आहे.
(३) नाही.
(४) होय.
(५) व (६) राष्ट्रीय कार्य-दशवार्षिक जनगणना, नैसर्गिक आपत्ती निवारण किंवा स्थानिक प्राधिकरण, राज्य विधानसभा / लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कर्तव्याखेरीज इतर कोणतीही अशैक्षणिक कामे शिक्षकांना न देण्याबाबतच्या सूचना दिनांक१८/०६/२०१० च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत.

देशातील प्रत्येक शाळा प्रगत करण्यासाठी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने शाळासिध्दी हा उपक्रम सुरू केला असल्याबाबत

(४९) ८३९३८ (२०-०४-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशातील प्रत्येक शाळा प्रगत करण्यासाठी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने शाळासिध्दी हा उपक्रम सुरू केला असून शाळासिध्दी हे सरकारी मानाकंन मिळविणे आता प्रत्येक शाळेला बंधनकारक करण्यात आले असतांनाही सध्या सुरू असलेल्या स्वयंमूल्यमापनाच्या प्रक्रियेला महाराष्ट्रातील ८० टक्के शाळांनी .सहभाग घेतला नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुषंगाने संबधितावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील केवळ १ हजार १८२ शाळांनी मानांकन नोंदणी केली असल्याबाबत

(५०) ८४१४४ (२०-०४-२०१७). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पहिली ते बारावीच्या सर्व शाळांना शालासिद्धी मानांकनासाठी नोंदणी करण्यात आले असले तरी जिल्ह्यातील ७ हजार २४९ शाळांपैकी केवळ १ हजार १८२ शाळांची नोंदणी पूर्ण झाली असून जवळपास ५ हजार ८९९ शाळांची नोंदणी झाली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भातील शहरातील अनेक नामांकित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना या उपक्रमासंदर्भात माहीतही नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार राज्यातील पहिली ते बारावीच्या सर्व शाळांना शालासिद्धी मानांकन नोंदणी पूर्ण होण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.